पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - 411 018.

# करआकारणी व करसंकलन विभाग

| | |
|---|---|
| परिपत्रक स्वरुप | मालमत्ता करात सूट देणेबाबत |
| परिपत्रक क्रमांक | कर/मुख्य/5/कावि/ 72 /2017, दिनांक - 03/04 /2017 |
| विषय | संरक्षण दलातील अविवाहित शहिद झालेल्या सैनिकांच्या नामनिर्देशित मालमत्तांना मालमत्ता करातून सूट देण्याबाबत |
| कोणाच्या माहितीसाठी | प्रशासन अधिकारी / सहा.मंडलाधिकारी / गट प्रमुख / रोखपाल / उपलेखापाल |
| संदर्भ | 1. शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-2016/प्र.क्र.59/नवि-20, दिनांक 09 जानेवारी 2017 |

परिपत्रक

उपरोक्त क्रमांक 1 चे शासन निर्णयान्वये नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या क्षेत्रात राहणा-या, जे सैनिक अविवाहित आहेत व ते देशाचे संरक्षण करताना शहिद झाले आहेत अशा अविवाहित शहिद झालेल्या सैनिकांच्या नामनिर्देशित मालमत्तांना मालमत्ता करातून सूट देण्याचा शासन निर्णय निर्गत केलेला आहे. त्या अनुषंगाने संरक्षण दलातील अविवाहित शहिद झालेल्या सैनिकांच्या नामनिर्देशित मालमत्तांना मालमत्ता करातून सूट देणेबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

1. पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रात राहणा-या जे सैनिक अविवाहित आहेत व ते देशाचे संरक्षण करताना शहिद झाले आहेत अशा अविवाहित शहिद झालेल्या सैनिकांच्या नामनिर्देशित मालमत्तांना सन 2017-2018 या आर्थिक वर्षापासून मालमत्ता करात (सामान्यकर, मलप्रवाह सुविधा लाभ कर, पाणी पुरवठा लाभ कर, रस्ता कर) सूट लागू राहील.
2. या सवलतीचा लाभ देणेकामी संबंधित जे सैनिक अविवाहित आहेत व ते देशाचे संरक्षण करताना शहिद झाले आहेत अशा अविवाहित शहिद झालेल्या सैनिकांच्या नामनिर्देशितांची माहिती जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांचेकडून प्रमाणपत्र उपलब्ध करुन घ्यावे.
3. शासनाचे शिक्षणकर, रोजगार हमी व फ्लोअरेज कर तसेच वृक्ष कर, विशेष साफसफाई कर यामध्ये सूट लागू राहणार नाही.
4. मिळकतधारकांनी सदर सूटीचा लाभ घेण्यासाठी थकबाकीसह सूटीची रक्कम वगळता संपूर्ण रक्कम भरणे अनिवार्य राहिल.

संरक्षण दलातील जे सैनिक अविवाहित आहेत व ते देशाचे संरक्षण करताना शहिद झाले आहेत अशा अविवाहित शहिद झालेल्या सैनिकांच्या नामनिर्देशित यांचे मिळकतींचे मालमत्ता करात सूट देणेबाबत प्रशासन अधिकारी यांना अधिकार राहतील.

**आयुक्त**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - 411018.

प्रति, 1) प्रशासन अधिकारी / सहा.मंडलाधिकारी, --------------- विभागीय कार्यालय

प्रत : 1) मुख्य लेखापरिक्षण विभाग 2) लेखा विभाग 3) संगणक विभाग 4) प्रॉबिटी सॉफ्ट प्रा.लि.